## जंत

१. अननसाचा रस प्यावा.

२. ओल्या हळदीचे लोणचे खावे.

## ॲनिमिआ

१. च्यवनप्राश रोज १ चमचा ( झंडू ).

२. लोखंडाच्या पळी गॅसवर तापवावी व पाणी भरलेल्या तांब्यात बुडवावी. असे ५ वेळा करावे. असे केल्यानंतर तांब्यातील पाणी गरम झालेले आढळेल. असे भारीत केलेले पाणी प्यावे.

३. बीट, पालेभाज्या खाणे.

४. फेरम फॉस ६ एक्स पॉवरच्या ४ गोळया दिवसातून ३ वेळा.

५. पाव वाटी पाण्यात ५ मनुका १ तास भिजवून मग खाव्या. वाटीतील पाणीही पिण्यास हरकत नाही.

## अर्धशीशी

१. डोक्यात ज्या भागात दुखत असेल त्या बाजूच्या नाकपुडीत शुद्ध तुपाचे २ – ३ थेंब सोडावे. हा उपाय किमान १ आठवडा करणे जरूरीचे आहे. किंवा
२. एकास एक प्रमाणात पाणी व लिंबू रस घ्यावा व त्याचे थेंब कानात घालावे. जर डोक्याची डावी बाजू दुखत असेल तर उजव्या बाजूच्या कानात व डोक्याची उजवी बाजू दुखत असेल तर डाव्या कानात हे थेंब घालावेत. किंवा याचप्रकारे लिंबूरसाचे थेंब नाकपुडीत घालावेत.
३. अश्र्वगंधा चूर्ण १ चमचा, एक कप दुधात १ चमचा साखर घालून रोज सकाळी प्यावे. असे ७ दिवस करावे.
४. सुंठ दुधात उगाळून वास घ्यावा व त्याचा लेप कपाळावर घालावा.
५. काय खावे ः द्राक्षे, गाजर, बीट, काकडी, पालक, टोमॅटो.
६. **Biplex Forte ( Niacin )** १ गोळी रोज दुपारी जेवणानंतर.
७. तुळशीच्या मंजिरीचे चूर्ण १ ग्रॅम मधाबरोबर २ – ३ वेळा घेणे.
८. **Nat. Mur ( NM ) 6 X 4** गोळया दिवसातून २ वेळा.
९. **Bio – compound No. 12 Headache** डोके दुखत असताना फक्त ४ गोळया दिवसातून ४ वेळा.

## आवाज बसणे . स्वरभेद

१. ज्येष्ठमध चूर्ण १ – २ ग्रॅम मध व गरम पाण्यातून कमीतकमी १ वेळा खाणे. रोज.

२. त्रिफळाचूर्ण व हळद एकत्र करून खाणे. ( आवाज बसला असल्यास )

## अति घाम येणे

१. आवळयाचे चूर्ण पाण्याबरोबर घेणे.

२. स्नानासाठी साबणाऐवजी त्रिफळाचूर्णाचा वापर करणे.

## केस गळतात

१. चमचाभर मेथी रात्री अर्धी वाटी पाण्यात भिजत घालून सकाळी वाटावी. त्यात गुळाचा खडा टाकून विरघळल्यानंतर न्हाताना प्रथम हे पाणी लावून मग शिकेकाई लावावी. ( आठवडयातून १ वेळा कमीतकमी )

२. स्नानानंतर डोक्याला चांगले मसाज करावे. ( रोज )

३. नारळाचे दूध केसांना लावून नंतर स्नान करावे. ( आठवडयातून १ वेळा )

४. १ वाटी खोबरेल तेल + मोठी तांबडया जास्वंदीची २ फुले + मोसंबीच्या ४ / ६ साली, माक्याचा पाला एकत्र उकळवून गाळून गार झाल्यानंतर बाटलीत भरावे. दररोज सकाळी केसांना हे तेल लावावे. किंवा आवळा तेल वापरणे.

## डोक्याची आग होते

१. रात्री झोपताना कैलासजीवन डोक्याला लावावे.

२. गुलाबपाण्याच्या घडया ठेवाव्या.